श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

मासिक पुस्तक

वर्ष २ रें.] माघ शके १८४६ [अंक ११ वा.

न किंचिदुल्लगत जक्षमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादक:—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी, [illegible] रोड, बांद्रे, पी. ओ. [illegible]

# अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... २७७-२९६

स्फुट विषय ... ... ... ... १६७-१७२

श्री साईसच्चरित ... ... ... ४३५-४४८


---

## वर्गणीचे दर

वार्षिक टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु. ३।≈ व्ही. पी. नें रु. ३॥≈, चालू अंकाची -।≈, मागील अंक शिलक असल्यास -॥

## विनंती.

या मासिकाचें वर्ष चैत्रापासून सुरू असतें. हा माघाचा म्हणजे वर्षाचे १२ महिन्यांपैकीं ११ वे महिन्याचा अंक वर्गणीदारांच्या हातीं पडत आहे. तरीही अजून ज्यांची या सालची वर्गणी आली नाहीं असे कांहीं वर्गणीदार आहेतच. तरी त्यांनीं चालू सालची बाकी लवकर पाठविण्याची कृपा करावी.

आणि हें मासिक पुढें सुरू ठेवण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं शके १८४७ सालची आपली वर्गणी मनीआर्डरीनें अगाऊ पाठविण्याची तजवीज ठेवावी अगर तें इकडून व्ही. पी. नें पाठविलें जावें असे ज्यांस वाटत असेल, त्यांनीं चालू वर्ष अखेरीचे आंत तसें लिहून कळविण्याची तसदी घ्यावी.

गो. र. दाभोळकर.

व्यवस्थापक.

## नोटीस.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांच्या नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.


गोविंद रघुनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला ऑफीस. ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें. बी. बी. रेल्वे.



शिर्डी येथें नित्य सकाळीं व दुपारीं ज्या लेंडीचे ( ओढ्याचे ) कांठीं
श्री साईबाबा जाऊन बसत त्या लेंडीचा देखावा.

15-2-12.

I got up as usual, prayed, and held our Panchadashi. class with Upasani Shastri, Bapusaheb Jog, and Mrs. Laxmi. bai Kaujalgi. We saw Sayin Saheb go out and continued our class. After it I went to the Musjid as usual and sat listening to what Sayin Sahib was saying. He was in a pleased mood and said that he had laboured very hard, had gone without food for months, fed on leaves of " Kala Takal ";Nimb and other trees. He said God was very good to him, for life never became extinct though all flesh got wasted and bones appeared to be in danger of crumbling away. The Midday Arti passed off as usual and after it we returned for our meals. My wife and others wished to go to Kopargaon to-morrow for Shivarartri. Sayin Saheb thought it unnecessary,but they persisted and ultimately got permission in a way. Today after the noon Puran we held a class for Paramamrit for the benifit of Dada Kelkar. We did not progress much as it was the first day. We saw Sayin Maharaj at his evening stroll and then after the wada Arti attended the Shej Arti. Balasaheb attened it. He used to hold the Morchael (peacockt-ail) before it came to me.So I tendered it back to him. I got a fan instead. Balasaheb Bhate has made considerable progress.

16-2-12

I attended the Kakad Arti. Sayin Saheb exhibited great grace accompanied by hard words. We held our Panchadashi class in the morning after prayer. My wife and others could not go to Kopargaon as they could not get a cart. We saw Sayin Baba go out. Mr. Morgaonkar has come and distributed a translation of Para Puja. There is a shastri from Kalyan Bhivandi. He is staying with Bapusahib Jog and is a very quiet nice man. We fasted today on account of Shivaratri.

17-2-12

I got up early in the morning, prayed and held our Panchadashi class with Upasani, Bapusaheb Jog, Kunte Shastri of Kalyan, and Morgaonkar. We finished the third chapter today. We saw Sayin Baba go out and again after he returned. He was in a very pleasant mood and made jokes. The midday Arti passed off as usual and after it we had our food. Mr. Dixit is thinking of going to Nagpur for the Munj of his son. He wishes to take with him as many from here as he can, but everything depends on the orders which Sayin Saheb gives. In the afternoon there was Dixit's Ramayan and then we held our Paramamrit class and made good progress. Later on we saw Sayin Maharaj at his stroll. Then there was the Wada Arti and Shej Arti. At the latter the big fan came to me. On our return Kunte Shastri of Bhiwandi did kirtan. He told the story of Uttar Gograhana, He is an old man and considering his age which is 80 years his powers of endurance, his energy and all else is very praiseworthy and remarkable. Mr. Dixit had his Ramayan and Bhishma read Bhagwat.

18-2-12.

Madhaorao Deshpande woke me up in the morning and after prayer attended the Kakad Arti. Sayin Saheb took it very cooly, and hard words said as usual after it were of a very mild character. Mr. Dixit is thinking of going to Nagpur for the thread ceremony of his son. He asked Sayin Baba to let me go with him and got an evasive reply. I feel almost sure that I shall not be permitted to go, My wife is very anxious to go. While I was in our Panchadasi class with Upasani Shastrio Bapusaheb Jog and others, Mr. Nana Saheb Chandorkar came and sat with Mr. Dixit. I met him when I went to see Sayin Saheb after our class. Sayin Saheb was talking with him in the usual way, about Teli, Waman Tatya, Appa Kotye etc., etc., The midday Arti passed off as usual except that towards the end of it Sayin Baba got a bit impatient and told the people to clear out fast. I had my food with Mr. Dixit in company of

Nana Saheb Chandorkar and I asked the latter to resume his conversation with me which was broken off when he was here on a short visit. He said the matter was in the hands of Sayin Baba. He has brought with him artificial garden with a big moon such as we have on marriage ceremonies. It was ordered by Radhakrishna Bai. I lay down for a while. Then Nana-saheb went away about 4 p.m. and Mr. Dixit read Ramayan. Later on we held our Paramamrit class and afterwards went to see Sayin Saheb at his evening stroll. The "moon" was lit and shed very splendid light. My wife renewed her request about returning to Amraoti and was as usual given an evasive reply by Sayin Saheb. After the Wada Arti Mr. Dixit read Ramayana and Bhishma had his Bhajan. We finished early to admit of Mr. Dixit and Madhaorao Deshpande making prepar_ations to depart tomorrow early in the morning.

19-2-12.

Mr. Dixit, his wife, Madhaorao Deshpande, Hiralal and others went away this morning. The Dixits went to Nagpur for the moonj of his son Babu. Madhaorao went to Harda for a similar ceremony in a friend's house. After prayer we held our Panchadashi class. Margaonkar said that he lost his watch and chain. They were both valuable being of gold. They were searched for in vain. We saw Sayin go out and again after he returned. The midday Arti passed off as usual except that there were two Chamars instead of only one. Balasaheb Bhate worshipped and wished to stay for the Arti, but Sayin Saheb ordered him home. After food I lay down for a while and then we continued our Panchadashi class with our usual members. Later on Dada Kelkar, Bala Simpi and others came. We saw Sayin Maharaj at his evening stroll and after the Wada Arti attended the Shej Arti when the artificial gardens and moon were used for the first time. They looked very nice and attracted a large crowd. Sayin Saheb did not appear to dislike them. I think the moon is helpful. Bhishma read Bhag_wat and ten Samasas of Dasa Bodh tonight. Mr. Natekar alias Hamsa writes me today to say that I ought to return to Amraoti by the end of this month.

20-2-12.

We attended the Kakad Arti and the remarkable part of it was that Sayin Saheb left the Chawadi and entered the Musjid without saying a single word except "God is the greatest, of all." After prayer I, Upasani, Bapusaheb Jog, Bhishma and Mrs. Laxmibai Kaujalgi held our Panchadashi class. When I went to the Musjid after Sayin Saheb returned from his morning walk, he said he wished to get the Musjid rebuilt. He said there was enough money for it and went on talking about it. Some Baroda ladies of the Shirke family have come here. They attended the mid-day Arti. It passed off as usual, Radhakrishnabai had the eggs of stork hung up where Sayin Saheb sits and he had them pulled down and thrown away. We continued our Panchadashi class in the afternoon and I went to the Musjid about 6 p.m. Sayin Saheb told two stories of which, do what I like, I cannot recall the first. I asked my wife and all those present and they also forgot which is wonderful. The other story was that there was an old woman living with her son. He used to assist in the disposal of the dead body of every body in the village and got remuneration for it. There prevailed a sort of plague and many died. So his emoluments were great. Allah met her one day and told her not to profit by the trade of her son. She spoke about it to her son but the latter paid no attention and eventually died. The old woman then maintained herself by spinning cotton. Allah told her to go to the house of the relations of her husband but she declined to do so. One day some Brahmins came to purchase cotton from her, spied out all the details of her house and broke into it at night. One of the burglers stood naked before her. She told him to run away as the town people would murder him for his crime. So the man ran away. Eventually the old woman died and was born as the daughter of the burglar. I am not quite sure that I understand the story quite right. We saw Sayin Saheb at his evening stroll and at night. After the Wada Arti, Bhishma read Bhagvat and Dasa Bodha.

श्रीसाईलीलेच्या अंकाबद्दल थोडोशी भानगड होती व बाबांचें थोडेसें काम होतें म्हणून मी एके दिवशीं ठाण्याचे श्रीमान व परोपकारी शेट रा. रा. नगीनदास मोतीलाल यांजकडे खाडीजवळ असलेले त्यांच्या बंगल्यावर गेलो, व त्यांस विचारलें कीं, 'आपणास कांहीं महाराजांसंबंधीं माहिती आहे काय व श्रीसाईलीलेचा अंक घेण्याचें आलें मनांत कसें आलें ?' ते म्हणाले "माझ्या वडिलांची शिरडीस जाण्याची फार इच्छा होती. परंतु ती पूर्ण झाली नाही. ते वारले. पण त्या पूर्वीं ते म्हणाले कीं 'माझी इच्छा पूर्ण झाली नाहीं पण तूं जाऊन ये.' मी महाराजांसंबंधीं कीर्ति ऐकली होती. पण मलाही पुष्कळ दिवस जाण्याची संधी मिळाली नाहीं. एके दिवशीं मुंबईचे प्रसिद्ध रा. रा. शिंगणे वकील व ठाण्याचे रा. रा. गंगादास वकील हे दोघे शिरडीस जावयास निघाले मी म्हणालों 'मीही तुमच्या बरोबर येतों.' आम्ही गाडी नक्की ठरवली. माझा बेत फिरला. मी म्हणालों 'मी येत नाहीं'. नंतर त्यांचा दोघांचाच जाण्याचा बेत ठरला. आपणही जावें असें माझ्या पुन्हां मनांत आलें. ते कोणत्या गाडीनें निघणार तें मला माहीत होतें. मी त्या दोघांस रात्रीं ठाण्याचे स्टेशनवर त्या गाडींत गांठलें व आम्ही तिघेजण शिर्डीस गेलों. तेथें गेल्यावर माझ्या मनांत आलें कीं आपण इतके लांबून दर्शनाकरितां आलों आहों तर महाराजांपुढें दक्षणा १५ रुपये ठेवावी. मी, गंगादास व शिंगणे यांस विचारलें कीं दक्षणा काय ठेवावी. ते म्हणाले एक एक रुपया ठेवावी. मला वाटलें एकेक रुपया ठेवणें बरोबर नाहीं. पण आपण सर्व दर्शनास बरोबर जाणार व आपण एकट्यानें जर १५ रुपये ठेविले तर तें बरोबर दिसणार नाहीं. तरी पण जास्त दक्षणा द्यावी असें मला वाटून ५ रुपये ठेवण्याचा निश्चय करून पांच रुपये बरोबर घेतले व आम्ही तिघे महाराजांच्या दर्शनास गेलों. उभे राहिलों; महाराज मजकडे पाहून म्हणाले 'म्हाताऱ्याचें येणें झालें नाहीं. बरं असो पोरगा आला, बरं झालं.' आम्ही नंतर पाया पडलों. गंगादास व शिंगणे यांनीं प्रत्येकीं एक रुपया दक्षणा दिली व मी पांच रुपये दिले. महाराज मला म्हणाले 'आणखी दक्षणा दे. तुझ्या मनांत आहे तितकी दे'. मी म्हणालों बिऱ्हाडीं जाऊन

पाठवून देतों. नंतर मी शिर्डीस गेलों व माझ्या मनांत आलें कीं आपल्या हेतूप्रमाणें १५ रुपये धावयाचे पैकीं पांच दिले व आतां १० धावयाचे, पण त्यावर शून्य आहे असा आंकडा कशास धावा. ११ रु. धावे म्हणून मी ११ रुपये पाठवून दिले. महाराज म्हणाले 'मनांत होते तितकेच धावे. जास्त कशाला ?' असें म्हणून महाराजांनी ११ पैकीं १० ठेवून घेतले व १ रुपया परत पाठवून दिला. यावरून महाराज पूर्ण अंतरज्ञानी आहेत अशी माझी खात्री झाली व मला आनंद झाला.

२. ठाण्याचे एक सद्गहस्थ प्रसिद्ध ब्रह्मीभूत काका महाराज पुराणीक यांचे भक्त आहेत. त्यांचे कनिष्ट बंधूही काका महाराजांचे भक्त आहेत. काका महाराजांचे अनुग्रहीत साताऱ्याजवळील पीरवाडीस राहाणारे प्रसिद्ध कोंडिबामहाराज म्हणून आहेत. वरील सद्गृहस्थ कधीं कधीं पीरवाडीस जातात. व पीरवाडीचे महाराज कधीं कधी ठाण्यास त्यांचेकडे येतात. वरील सद्गृहस्थ, त्यांचे बंधु व त्यांचे आणखी स्नेहीद्वय पैकीं एक मास्तर या नांवांचे व दुसरे जोशी यांस शिरडीस जाण्याची इच्छा झाली. सन १९११ चे डिसेंबर महिन्यांत एक दिवस नक्की ठरला. त्या दिवशीं कनिष्ट बंधूस कांहीं कारणामुळें जांतां येईना. त्यामुळें त्यांस जरा वाईट वाटून रागही आला. ते म्हणाले बरें आहे. तुम्ही जा मला दर्शन होणें असेल तर एथल्याएथेंच होईल. नंतर ठरल्याप्रमाणें बाकीची मंडळी शिरडीस गेली. प्रत्येकांनीं श्री पुढें ठेवण्याकरितां एकेक नारळ व दक्षिणा नेली होती. वरील गृहस्थांनीं मात्र त्यांचा स्वतःचा व आपले कनिष्ट बंधूचा असे दोन नारळ नेले होते. श्रीचे दर्शनास गेल्यानंतर सर्वांनीं आपापले नारळ व दक्षिणा श्रीचे चरणीं अर्पण केली. शिरस्त्याप्रमाणें नारळ फोडून प्रसाद म्हणून श्रींनीं ज्यांचा त्याचा नारळ त्याचा त्यास दिला व एक भाग आपल्या हातांत ठेविला जो तो म्हणूं लागला कीं आपला भाग आपणाला मिळाला मग आतां महाराज हातांत कोणाचा भाग घेऊन बसले आहेत. इतक्यांत वरील सद्गृहस्थाकडे पाहून तो भाग घेण्याची महाराजांनी त्यांस

खूण केली. हे गृहस्थ मनांत समजले कीं हा भाग आपल्या बंधूच्या नार-ळाचा आहे. त्यांनी तो घेतला व त्यास आनंद झाला.

दुसरे दिवशी ही मंडळी दर्शनास गेली तेव्हां महाराज एकच पाय पसरून बसले होते. त्यामुळें वरील गृहस्थांस त्यांच्या दोन्ही पायांचें दर्शन होतां येईना. ते मनांत म्हणाले कीं, महाराज जेव्हां दोन्ही पाय पसरून बसतील तेव्हांच मी पाया पडेन, नाहींतर तसाच बसेन. असा विचार करून ख्रिश्चन सारखे दोन्ही गुडघे जमनीस टेंकून ते महाराजांपुढें बसले. थोडयाच वेळानीं महाराजांनीं दुसरा पाय पसरला. तेव्हां वरील गृहस्थांस आनंद होऊन ते त्यांच्या पाया पडले. महाराजांनीं त्यांची टोपी फेकून दिली व त्यांस उदी घेण्यास सांगितलें. उदी आणून महाराजांचे हातांत दिल्यावर महाराजांनीं त्यांचे डोक्यावर एक हात ठेविला व दुसरे हाताचे आंगठ्यानें उदी लाविली. त्यावेळेस त्या सद्गृहस्थास जें काय वाटलें त्याचें वर्णन त्यांस करतांच येत नाहीं. आपण शुद्धीवर होतों कीं नव्हतो हें त्यास कळेना. मात्र अवर्णनीय आनंदांत होतों इतकेंच त्यास वाटलें.

महाराज जाण्यास परवानगी देत नाहींत असें त्यांनीं ऐकिलें होतें, परंतु त्यांस परत जाण्याची मुळींच अडचण पडली नाहीं. सकाळ-संध्याकाळ पाया पडण्याची इच्छा. एक दिवस संध्याकाळीं पाया पडणें विसरले. हुरहुर लागली. स्वारी भिंतीवर हात टेकून उभी राहिली होती. शिव्या देण्याला सुरवात झाली. हे गृहस्थ जातात तो महाराज म्हणाले "इतके दिवस बामणाचें पाया पडत होते तो मेला. त्याला मारला. आतां आले मुसलमानाच्या पाया पडायला." वरील गृहस्थांस खूण पटली व आपले गुरू काका महाराज व साईमहाराज हे एकच आहेत अशी खात्री होऊन, आनंद झाला. व महाराजांच्या लीलेचें कौतुक वाटलें.

नंतर महाराजांची आज्ञा घेऊन ही मंडळी ठाण्यास येण्याकरितां निघाली. त्यांनी महाराजांस विनंती केली कीं आपले कनिष्ठ बंधूस आपल्या दर्शनाची फार इच्छा आहे; त्यांस दर्शन केव्हां व कसें घडेल ? महाराज म्हणाले

घडेल. जा.' सदर गृहस्थांनी झालेली हकीकत आपण घरीं परत आल्यावर आपले धाकटे बंधूस सांगितली.

त्यानंतर थोडे दिवसांनीं असा चमत्कार झाला कीं, एक कोंकणांतील गृहस्थ आपल्याबायका मुलांसह महाराजांचे दर्शनास गेले. ते परत कोकणांत जातेवेळी त्यांनीं महाराजांची परवानगी विचारली. महाराजांनीं ती दिली महाराज म्हणले 'पण तूं माझे एक काम करशील कां?' ते गृहस्थ म्हणाले होय करीन. महाराजांनीं एक उदीची पुडी केली व ती त्यांचे जवळ दिली. व म्हणाले कीं तुला ' आतां धांवती गाडी ( मेल ) मिळेल. त्या गाडींत तूं गेलास म्हणजे कल्याणपासून मुंबईपर्यंत तुझे डब्यांत जो मनुष्य येऊन बसावयास तुजजवळ टीचभर जागा मागेल त्यास ही पुडी दे.' ते गृहस्थ म्हणाले पण कोणी नच आला तर मी तुम्हांस तसेंच कार्ड लिहीन. बाबा म्हणाले बरें. लिही.' नंतर ते गृहस्थ ती पुडी घेऊन शिरडीहून निघाले. कोपरगावांस आले तो मेल खेरीज दुसरी गाडीच नव्हती. ते मेलमध्यें बसले. गाडींत गर्दी फार. ते दुसरे दिवशीं कल्याणला आले. कल्याणास कोणीही इसम त्यांचे डब्यांत त्यांचे जवळ टीचभर जागा मागण्यास आला नाहीं. तेव्हां त्यांस वाटलें कीं आतां कोण येणार ? ही गाडी तर आतां थेट मुंबईस जाणार. म्हणून ते बाबांस कार्ड लिहिण्याच्या बेतांत होते. इतक्यांत गाडी सुटली. गाडी ठाण्यास उभी रहाते हें त्यांस माहिती नव्हतें. गाडी ठाणे स्टेशनवर आली. या गृहस्थांचे डब्यांत चिकार गर्दी. गाडी सुटण्याची वेळ झाली. इतक्यांत ठाणें येथील सद्गृहस्थांचे कनिष्ठ बंधूस त्यांचे घरीं कांहीं नैमित्तिक असल्यामुळें मुंबईच्या ऑफिसांत जाण्यास उशीर झाला होता. म्हणून ते इतक्या घाईने स्टेशनवर गेले कीं त्यांच्या सर्वांगास घामाच्या धारा लागून जर आपणांस आतां डब्यांत बसण्यास जागा मिळाली नाहीं, तर आपणास घेरी येईल असें वाटून ते या कोंकणी गृहस्थाच्या डब्यांत बसले होते त्याच डब्यांत घाइघाईनें शिरले व जागेकरितां इकडे तिकडे पाहूं लागले. गर्दी तर फार व जागा नाहीं. इतक्यांत त्यांची

नजर हे कोंकणी गृहस्थ आपल्या कुटुंबासह जेथें बसले होते तेथें गेली. त्या बाकांवर हे कोंकणी गृहस्थ, त्यांची बायको, त्यांचा एक तान्हा मुलगा व दुसरी एक त्यांचेच बरोबर असलेली बाई ही इतकी मंडळी व दुसरी इतर अशी बरीच माणसें गर्दीनें बसली होतीं. परंतु तान्हा मुलगा जेथें निजला होता तेथें खरोखरच एक टीचभर जागा रिकामी होती. ठाणेकर कनिष्ट बंधूंनीं ती जागा पहातांच ते तसेंच त्या गर्दीतून त्या कोंकणी गृहस्थाजवळ गेले व म्हणाले महाराज कृपाकरून मला बसण्याकरितां आपल्याजवळ टीचभर जागा द्याल काय? त्या कोंकणी गृहस्थांस बाबांच्या अगाध लीलेचें व ऐश्वर्याचें परम कौतुक वाटलें. व त्यांनीं आपला तान्हा मुलगा तेथून उचलून घेऊन व आपणही सर्व पलीकडे होऊन खिडकी-जवळ या कनिष्ठबंधूस ऐसपैस जागा रिकामी करून दिली व बाबांनीं दिलेली उदीची पुडी त्यांस दिली व झालेली हकीकत त्यांस सांगितली. व कनिष्ठ बंधूंनीं पुडी उघडून उदीचें वंदन करून आपल्यास घरच्या घरींच श्रीचें दर्शन झाल्याबद्दल धन्यता मानून बाबांच्या अतर्क्य लीलेबद्दल संतोष व आनंद व्यक्त केला. (ठाणेकर सद्गृहस्थांनीं आपलें नांव कोणास कळूं नये, असें सांगितल्यावरून त्यांचा नामनिर्देश केला नाहीं.)

३. ठाणें येथील माझे स्नेही रा. रा. सखाराम हरी उर्फ बापूराव जोशी शहापूरकर यांच्या कांहीं भानगडीच्या खासगी कामाकरितां आपल्या वडील बंधूसह वर्तमान कागदपत्र घेऊन मजकडे एके दिवशीं रात्रीं आले. आम्हीं सर्व जण त्या कागदपत्रांचा खल करीत त्या रात्रीं सुमारें २–३ वाजेपर्यंत बोलत बसलों होतो. ही नुकती गेल्या जूनच्या ९ तारखेची गोष्ट. बापूरावास त्यांच्या कामाबद्दल व विपरीत परिस्थितीबद्दल तळमळ लागून राहिली होती. २–३ वाजल्यानंतर त्यांनीं माझ्या घरच्या नुकत्याच मुद्दाम काढून आणविलेल्या महाराजांच्या सुंदर व मनोहर तसबिरीचें (Oil Painting) दर्शन घेतलें. व ते आपल्या घरीं गेले. पण त्यास झोप म्हणून येईना व कांहीं सुचेना. पांच साडेपांच झाले. इतक्यांत त्यांस एक स्वप्न पडलें. तस-

शिरीतील बाबांची हुबेहुब मूर्ति त्यांचे पुढे येऊन उभी राहिली. बाबांनी त्यांस दर्शन दिलें व म्हणाले

" साधक भावें नमस्कार घाली। त्याची चिंता साधूस लागली।
सुगमपंथें नेऊन घाली। जेथील तथें ॥ "

दासबोध ॥ द. ४ ॥ स. ६ ॥

बापूराव जागे झाले. त्यांस फार आनंद झाला व त्यावेळेपासून त्यांच्या मनाची तळमळ बंद झाली. नंतर ही गोष्ट त्यांनीं मला ता. ३-९-१९२४ रोजीं सांगितली. ते अद्यापपर्यंत शिरडीस गेलेले नाहींत, व त्यांनीं महाराजांस प्रत्यक्ष कधींही पाहिलें नाहीं. आतां मात्र आपल्यास शिरडीस जाऊन प्रभूंच्या समाधीचें दर्शन घेण्याची उत्कट लालसा उत्पन्न झाली आहे, असें ते म्हणाले. यावरून महाराजांचा संचार कुठकुठें व कसा होत असतो, संकटसमयीं अनन्यभावें शरण आलेल्या भक्तास निर्भयतेचें ते कसें आश्वासन देतात, त्याच्याबद्दलची चिंता आपण कशी वहातात व त्याचा मार्ग सुगम करून त्यास योग्य दिशा कशी दाखवितात हें एक त्यांचें त्यांसच माहीत. आपणमात्र त्यांच्यावर पूर्ण भरंवसा टाकून कर्तव्य करीत रहावें हेंच योग्य.

४. मुरबाडकर कै. माधवराव भिडे यांचे चिरंजीव रा. रा. बन्याबापू हे कुर्ल्यास रहातात. गेल्या ८-१० महिन्यांच्या आंत एके दिवशीं ते सहज मजकडे आले. व बांच्या गोष्टी निघाल्या. त्यांत, महाराज दक्षणा मागत असत. परंतु घरीं जाण्यास लवकर परवानगी देत नसत व अशाच प्रकारचे दुसरे गैरसमज त्यांच्या बोलण्यांत आले. मी म्हणालों बन्याबापू तुम्हांस महाराजांबद्दल प्रत्यक्ष माहिती आहे काय ? ते म्हणाले नाहीं. मग तुम्ही बोलतां हें खरें कशावरून ? ते म्हणाले लोक असें म्हणतात. मी म्हटलें मी जर तुम्हांस खरी माहिती दिली तर तुम्ही मजवर भरंवसा ठेवाल काय. ते म्हणाले अलबत. माझे समजुतीप्रमाणें मी त्यांस सर्व खरी हकीकत सांगितली. त्यांना ती पटली. त्यांनीं लगेच साईलीलेचे पहिल्या वर्षाचे अंक घेतले व साईलीलेचे ते कायमचे वर्गणीदार झाले. साईलीलेच्या

मुखपृष्ठावर असलेला फोटोच त्यांनीं देवांत ठेविला व त्याची ते पूजा करूं लागले. त्यांच्यावर दोनतीन संकटें आलीं. ते अगदीं गांगरून गेले. नित्य महाराजांच्या फोटोजवळ एकांत प्रार्थना करीत. हप्तेबंदी करा व पैसे फेडून घ्या असे त्यांनीं आपले सावकारास कितीकवेळां पूर्वी सांगितलें. सर्व पैसे एकदम घेईन असें म्हणून त्यांनीं बन्याबापूवर कोर्टांत फिर्याद लावली. महाराजांच्या लीलेची मौज अशी कीं, नेमलेले तारखेस बन्याबापू फिकीरींतच कोर्टांत गेले. सावकारजींची तेथें गांठ पडली. सावकारजी म्हणाले काय भिडे ! एकदम पैसे घ्यावे असें वाटत होतें पण आतां हप्तेबंदीनें पैसे द्या. बन्याबापूस आनंद झाला. व ते बाबांच्या भक्तवत्सलतेचें कौतुक करूं लागले. व त्यांनीं लगेच ही हकीकत मला सांगितली.

बन्याबापूस कांहीं अडचणींमुळें पैशाची जरूर फार. पण मागेल तितक्या व्याजानेंही कोणी सावकार पैसे देईना. बन्याबापू पेंचांत सांपडले. महाराजांची लीला अतर्क्य. एका इसमानें न मागतां बन्याबापूंचें घरीं येऊन त्यांस जरूर असलेली रक्कम दिली व म्हणाला भिडे रक्कम राहूं द्या तूर्त तुम्ही आपलें काम तर करून घ्या. बन्याबापूस परमाश्चर्य वाटलें. त्यांनीं लगलीच २५ रुपये मजकडे महाराजांच्या कायम फंडास आणून दिले. ते मी रा. रा. अण्णासाहेब दाभोळकर, शिरडी कायम फंडाचे खजिनदार यांजकडे पाठविले.

बन्याबापूंच्या मातुश्रीस एक गळू झालें. फार वेदना होऊं लागल्या. औषध करावयाचें नाहीं हा निश्चय. बन्याबापू म्हणाले, 'आई औषध करावयाचें नाहीं तर गळूंत महाराजांची उदी भरतों.' काय व्हावयाचें असेल तें होईल, आई म्हणाल्या भर. बन्याबापूंनीं गळूंत उदी भरली व गळू बरें झालें. बाबांची अगाध लीला. आमचे डॉक्टर, वैद्य व प्रत्येक गोष्ट शास्त्राच्या चष्म्यानें पाहाण्याची सवय लागलेले शिक्षित बांधव ही गोष्ट खरी मानतील काय ? न मानोत बिचारे. गोष्ट तर खरोखरच खरी.

—बाबांचें बाळ.

रा. रा. श्रीसाईलीलाकर्ते यांस कृ. शि. सा. न. वि. वि.

परमपूज्य श्रीसद्गुरू साईबाबांची लीला खरोखरच अगम्य व अतर्क्य आहे. ज्याचा जसा भाव, जशी भक्ति व जशी इच्छा असेल त्याप्रमाणें महाराज आपल्या भक्तांना कोणास प्रत्यक्षपणें तर कोणास दृष्टांतरूपानें अथवा इतर अनेक अन्य पण सुलभ व गोड मार्गांनीं, त्यांचें ध्येय न बदलतां त्यांच्या अधिकारानुरूप शिकवणूक देऊन, त्यांना सन्मार्गास लावीत, अद्यापही लावीत आहेत व पुढेंही लावतील अशी माझी पूर्ण खात्री आहे. मला त्यांनीं स्वप्न-रूपानें दिलेली शिकवणूक मी आपल्याकडे पाठवित आहें. तीस आपल्या सुंदर व सन्मान्य श्रीसाईलीलेच्या एखादे अंकांत जागा देण्यास नम्रता-पूर्वक विनंती आहे.

१. सुमारें १२ वर्षांपूर्वी एकदां फाल्गुन महिन्यांत प्रसिद्ध स्वामीपंचायत-नापैकी वडगांवच्या श्रीसद्गुरु जयरामस्वामी महाराजाच्या गादीवरील हलीच श्रीकृष्णस्वामी डहाणूस आले होते. मी त्यावेळीं डहाणूसच होतें. त्यांनी मला एक माळ दिली व " कृष्णाय वासुदेव " हा मंत्र रोज ५०० वेळां जपण्यास सांगितला. त्याप्रमाणें मी जपही करूं लागलें. पुढें रामनवमीस मी व माझी धाकटी भावजयी चि. सौ. जानकी वहिनी वगैरे मंडळी प्रथमच शिरडीस गेलों, व रा. रा. बापूसाहेब जोग यांचेकडे उतरलों; बापूसाहेबांचें कुटुंब सौ. आई म्हणाल्या आज रामनवमीचे रात्रीं बाबा श्रीदत्ता-सारखे दिसतात. मी म्हणालें मी येईन त्या म्हणाल्या पण तेथें बाबा कोणास येऊं देत नाहींत. हें ऐकून मी त्याच वाड्यांत लिंबाचे पारावर निजलें. आई गेल्या परंतु बाबांनीं त्यांसही मशिदींत येऊं दिलें नाहीं. त्या परत आल्या व घरीं निजल्या. मी पारावर निजलें असतां मला एक स्वप्न पडलें. माझी उपास्यमूर्ती श्रीशंकर आहे. मी स्वप्नांत त्या रात्रीं एक शंकरमूर्तीच पाहिली. तशी मूर्ती मी पूर्वी कधींही स्वप्नांत अथवा जागृतींत पाहिली नव्हती. चंद्रप्रभेप्रमाणें देदीप्यमान, श्रीगंगाबाईच्या शुभ्र स्फटिकाप्रमाणें पडत असलेल्या पाण्याच्या धारेनें मंडीत केलेला मस्तकावरील जटाभार, नग

रिराज तनया श्रीपार्वती मातेनें विभूषित केलेला एक अंक व जगदंश श्रीशारदा रमण, श्रीगणेश व अतुलप्रतापी सुरेंद्र सेनापती श्रीषडानन यांनी सुशोभित केलेला दुसरा अंक अशी ही दिव्य व विशुद्धकांत श्रीरुद्र-रूपमूर्ती पाहून मी जागी झालें. त्यावरून मला असें वाटतें की त्या-रात्री बाबांचें दत्तरूप पाहण्याची जी मला इच्छा झाली होती व कदाचित ती इच्छा प्रत्यक्ष नाहीं. पण स्वप्नांत जरो पुरी झाली असती तरी मी आतां कोणतें उपास्य दैवत मानावें कोणाची पूजा करावी—श्रीदत्तरूप बाबांची किंवा पूर्वीपासून मानलेल्या श्रीशंकराची,—ही शंका माझे मनांत राहूं नये, म्हणून महाराजांनीं मला शंकररूप दाखवून श्रीदत्त श्रीभवानीरमण भोलानाथ हे एकच आहेत असें दर्शविलें—इतकें झालें तरी आम्हीं शिरडीहून डहाणूस आल्यावर पुन्हां अशी शंका येऊं लागली कीं वडगांवकर श्रीकृष्ण स्वामींनी सांगितलेला जप करावा कां शंकराचीच उपासना करावी, कां जपही करावा व उपासनाही करावी. इतक्यांत दोन चार दिवसांनीं दुसरें स्वप्न पडलें.

२. चि. सौ. जानकी वहिनी माझ्याकडे आली व मला म्हणाली कीं वत्स तुम्हालां घरीं (म्हणजे माझे धाकटे बंधूनीं) लौकर चोलाविलें आहे. तुम्ही बिऱ्हाड बदलूं नका. या दारानें पाहिजे तर वागूं नका. दुसरें दार पाडा. पण बिऱ्हाड मात्र बिलकूल बदलूं नका. नंतर मी बंधूकडे यावयास निघालें तों वाटेंत भाजें येथें आमच्याच घरांत बिऱ्हाडानें राहत असलेल्या सौ. कृष्णाबाई बरवे ह्या भेटल्या व म्हणाल्या कीं तुम्हांस दुसरें दारही पाडण्याची जरूर नाहीं. येथें दुसरें दार आहेच. व त्या दारानें आलें म्हणजे मनुष्य आमचेंच घरांत येतें. यावरून बाबा आपणास उपासना बदलण्यास सांगत नाहींत व कोणत्याही मार्गांनी उपासना केली तरी ती त्यांचेकडेच जाते असें मला वाटूं लागलें. व त्या नंतर मी पूर्वीप्रमाणें शंकराची उपासना व श्रीकृष्ण स्वामींनी नवीन सांगितल्याप्रमाणें जपही करूं लागलें. त्यानंतर मला बाबांची तसवीर

मिळाली व पुन्हां वाटूं लागलें कीं, आतां शंकराची पूजा करावी का बाबांची करावी. महिन्या दोनमहिन्यांनी तिसरें स्वप्न पडलें.

३. मी पौड ( मुळशी पेठ्यांत एक गांव आहे तेथें माझें माहेर आहे ) येथील घराजवळ विहिरीवर भूत आहे व शेजारीं आमचे मामेचुलते आहेत यांचे घरीं कांहीं वेदघोष चालला आहे. चौकशीअंतीं कळलें कीं, त्या घरांत वेदशाळा आहे. मी आंत गेलें व पाहिलें तों सात आठ मुलें वेद पठण करीत आहेत व पुढील ओटीवर पण भुईवरच बाबा बसले आहेत. व त्यांचे पुढें स्नान करून माझे धाकटे बंधू उभे आहेत. आतां आपल्यास बाबांचें चांगलेंच दर्शन होईल असें वाटून मी पुढें गेलें व बाबांचे पायां पडलें. तेव्हां बाबा हसत हसत म्हणाले " आपण नाहींरे बोवा "बाबा." आपल्याला कोण " बाबा " म्हणतय्. आपण तर " शंकर " आहों. इतकें ऐकून मी जागी झालें व मला अत्यानंद झाला.ध्येय कायम ठेवून सर्वव्यापक परमात्म्याची भक्ति कशी करावी या महाराजांच्या अमोल शिकवणुकीचें व त्यांच्या सर्व साक्षित्वाचें व अनुपमेय लीलेचें कौतुक वाटलें. नंबर २ चे स्वप्नांत बाबांनीं मला माझ्या धाकटे बंधूंच्या सौभाग्यवतीकडून म्हणजे जानकी वहिनीकडून व माझ्याच घरांतील बिऱ्हाडांत राहणाऱ्या मैत्रिणीकडून ध्येय न बदलण्याबद्दल सुचविलें. त्यांनीं स्वतः स्वप्नांत येऊन सांगितलें नाहीं. त्या मुळें माझी संशयनिवृत्ति झाली नाहीं म्हणून ह्या वरील स्वप्नांत तीच गोष्ट स्वतः विनोदपूर्ण शब्दांत सांगितली. खरेंच सद्गुरूंच्या अगाध ऐश्वर्याचें, भक्तवत्सलतेचें व निरुपम प्रेमाचें कोण वर्णन करूं शकणार ?

४. नंतर कांहीं दिवसांनीं भाजे येथें असतांना चातुर्मास्यांत श्रीगजाननास रोज १०८ दूर्वा वहाव्या अशी इच्छा होऊन तसा नियमही केला. परंतु दूर्वा घरांत पूर्वीपासून असलेल्या देवांतील श्रीगजाननाचे मूर्तीस वहाव्या कां नवीनच मिळालेल्या बाबांच्या तसबिरीस वहाव्या अशी शंका उत्पन्न झाली. तों लागलीच एके रात्रीं स्वप्न पडलें कीं मी घरच्या देवांची पूजा करीत आहें इतक्यांत बाबा आले व देवघराशेजारीं देवांचें

असें तोंड होतें तसे म्हणजे पश्चिमाभिमुख, तोंड करून उभे राहिले. मी लागलीच त्यांस पाट बसावयास दिला. ते पाटावर बसले. नंतर मी त्यांचेकडे पाहूं लागलें तों ते शुंडादंडासहवर्तमान गजवदन मंगलमूर्तीच दिसूं लागले. तेव्हां महाराज हे भक्तांतर्यामी राहत असून भक्तसंशयनिरसन व भक्तभ्रमनाशन करणारे परमात्मा असून तेच विद्यादेवीशीं विलास करणारे श्रीगणेश आहेत असें वाटून मी नेमाप्रमाणें चातुर्मास्यांत दूर्वा त्यांचेच तसबिरीवर रोज वहात असें.

५. सुमारें ८-१० वर्षांपूर्वी मी भाजे येथें असतांना असा नियम केला होता कीं, रामनामाचा लक्ष माझे घरीं असलेल्या श्री मारुतिरायाचे मूर्तीस वहावयाचा म्हणजे " रामनाम " हीं अक्षरें प्रत्येक दिवशीं जितकीं लिहितां येतील तितकीं एका कागदावर लिहावयाची व कागद मारुतिरायाचे चरणीं वहावयाचा, व त्या रामनाम संख्ये इतक्या मारुतिरायास रोज प्रदक्षिणा घालावयाच्या व नंतर तीं कागदावर लिहिलेलीं रामनामें कातरून, कणीक तूप व साखर यांचें मिश्रणकरून त्याच्या लहान:लहान गोळया करावयाच्या त्या एकेक गोळींत एकेक " रामनाम " घालून त्या गोळया भाजे येथील श्री इंद्रायणींत अगर चिखली येथील श्री कात्रेरीनदींत माशांस खाण्याकरितां टाकून द्यावयाच्या. व हा लक्ष पुरा झाला म्हणजे श्री ज्ञानेश्वरी नित्य नेमानें रोज वाचावयाची. लक्ष संपतो न संपतो इतक्यांत एक स्वप्न पडलें.

" मी एके दिवशीं शिरडीस गेलें. एका मोठ्या वाड्यांत बाबा एका नूतन लाल वस्त्रावर तांबडे लोडाशीं टेकून पांढरी बोंगडी पांघरून पाय पसरून एकटेच बसले आहेत. जरा दूर पण एका कोपऱ्यांत त्याच वाड्यांत रा. रा. नानासाहेब चांदोरकर व त्यांचें कुटुंब सौ. आईसाहेब एका पलंगावर बसल्या आहेत. मला वाटलें आतां बाबा एकटेच आहेत मी आपली चांगली पाया पडेन व त्यांचे पाय चेपीत बसेन. या भानांत मी नानासाहेबांशीं व आईसाहेबांशीं बोललें सुद्धा नाहीं. जवळ जातें तो

महाराजांनीं झटकन् आली घोंगडी पायावर व तोंडावर घेऊन पाय आंखडून सर्व शरीराची जुडी करून बसले. व म्हणाले "आली आली पाया पडायला, नको माझ्या पाया पडूं. कधीं पहावें तों करते पापड्या, व कधीं पहावें तो करते चीकवड्या. करावयाचें तें करीत नाहीं व न करावयाचें तें करीत बसते." मला फार वाईट वाटलें. मी मनांत म्हटलें मी एकटी, मला पापड्या व चिकवड्या काय करावयाच्या आहेत व मी त्या कधीं करीतही नाहीं. मग बाबा असें कां म्हणाले बरें. इतक्यांत आईसाहेबांनीं मजकडे पाहिलें व त्या नानासाहेबांस म्हणाल्या कीं आऊताई बाबांच्या पाया पडावयास आल्या आहेत व बाबांनीं पाय आखडून घेऊन पहा कसा अवतार घेतला आहे तो. नानासाहेबांनीं मला हांक मारली व विचारलें कीं तुम्हाला एक इसम स्टेशनकडे गेलेला दिसला काय. मी म्हणालें होय. ते म्हणाले पहा तो बाबांचे दर्शनास आला होता. त्यास बाबांनीं दर्शन दिलें नाहीं. पण तो वेडा तसाच निघून गेला. अहो बाबांचा राग इतरासारखा खुनशी नसतो. ते आतां रागावतील व लागलीच गोड बोलतील. त्यांच्या प्रेमांत जसें कल्याण भरलेलें असतें तसेंच त्यांच्या रागांतही असतें. परंतु ही मौज त्या बिचाऱ्यास काय माहीत. व ती त्यास कशी कळणार. इतकें ऐकून मी जागीं झालें."

हें स्वप्न मी आपलें कनिष्ठ बंधूस सांगितलें तेव्हां ते म्हणाले कीं रामनाम लिहिलेले कागद त्या पापड्या त्या रामनाम मिश्रित ज्या कणीक, तूप व साखरेच्या गोळ्या त्या चिकवड्या असाव्या. व ह्या न करितां तुम्ही आपल्या मनांतील हेतूप्रमाणें श्री ज्ञानेश्वरीच वाचावी. माझाही लक्ष पुरा होत आला होता. तो मी लवकरच संपवून श्री ज्ञानेश्वरी दररोज वाचण्यास तावडतोब सुरवात केली.

या स्वप्नांत खरोखरच अवर्णनीय मजा भरलेली आहे. वरील प्रकारचे नियम बहुधा स्त्रियाच करतात. व पापड्या व चिकवड्या करण्याचेंही

काम त्यांचेंच असतें. महाराजांनी तरी सम्यक व बायकांस सहज समजेल असाच दृष्टांत देऊन माझी समजूत घातली. महाराजांच्या शिकवणुकीची शैली कोण वर्णन करणार!

६. या नंतर कांहीं दिवसांनीं जेष्ठ महिना संपतासंपतांच मला भाजे येथें ६ वें स्वप्न पडलें कीं, मी कोठेंतरी रस्त्यानें चाललें आहे. मला एक मोठा दरवाजा दिसला. आंत पहाण्याकरितां आंत शिरलें. आंत एक मोठी थोरली साफसूफ केलेली बखळ दिसली. तेथें बाबा शौचाहून येऊन पाय धूत होते. मी जवळ गेलें. बाबा म्हणाले "पाया पडावयाचें आहे काय? पड पाया." असें म्हणून बाबांनीं पाय पुढें केले. मी पाया पडलें. मला म्हणाले "जवळ बैस." मी जवळ बसलें. व तेथें शे दोनशे बैलगाड्या पाहिल्या. मी बाबांस म्हणालें कीं येथें ह्या इतक्या गाडया कशाकरिता आल्या आहेत? बाबा म्हणाले "सज्जन गडावर श्री रामदास स्वामींचा उत्साह आहे. त्याकरितां ह्या गाडया आलेल्या आहेत व मीही तिकडेच जाणार आहे. तूं येतेस का? का तुला कोणी दुसरे सोबत पाहिजे?" मी म्हणालें मी येतें व आपण बरोबर असल्यावर मला दुसरे सोबतीची काय जरूर? इतकें बोलून मी जागी झालें. व विचार करूं लागलें कीं हें काय बरें स्वप्न असावें? हल्लीं जेष्ठ महिना संपत आला आहे. सज्जनगडावरील उत्साह माघांत दास नवमीस किंवा चैत्रांत रामनवमीस असतो. मग हल्लीं हा उत्सव कोठला व कोणाचा? ज्येष्ठांत अगर आषाढांत तर सज्जनगडावरील उत्सव खात्रीनें नाहीं. मग हें स्वप्न हें काय? २-३ दिवसांनीं मला माझ्या धाकटे बंधूंचें पत्र आलें कीं, तुम्ही ताबडतोब ठाण्यास निघून या. त्याप्रमाणें मी लागलीच निघून ठाण्यास गेलें व इतक्या निकडीनें बोलावण्याचें कारण काय म्हणून बंधूस विचारलें. तेव्हां ते म्हणाले कीं, हल्लीं येथें श्री कोपनेश्वराचे मंदिरांत श्रीराम भक्तिपरायण वे. मु. बाळाजी बुवा यांनीं चालविलेला श्री रामदास स्वामींचा उत्साह सुरू आहे. तो १५ दिवस चालतो. पुष्कळ ठिकाणचे लोक आले आहेत. म्हणून तुम्हांस बोलावलें. मला हें ऐकून

परमानंद व विलक्षण आश्चर्य वाटलें, व बाबांचे विश्वकल्याणकर्त्याची व भक्तवत्सलत्वाची व स्वप्नांतच नव्हे पण जागृतींतही जो उत्साह मल्ल्यान्न मंदिन्यांत असणें शक्य नाहीं असें खात्रीपूर्वक वाटत होतें तोच श्री समर्थ रामदास स्वामी महाराजांचा उत्सव खरोखर आपाढांतच आहे असा प्रत्यय आणून देण्याच्या अप्रतिम ऐश्वर्याची स्तुती करावी तितकी थोडीच।

७. कांहीं दिवसांनीं मी चिखलीहून ( गुजराथेंत सुरत जिल्ह्यांत चिखली म्हणून एक तालुका आहे जेथें माझे कनिष्ठ बंधू मामलेदार होते ) शिरडीस गेलें. एके दिवशीं बाबा मशींदीतून लेंडीवर जात असतां नित्याप्रमाणें वाटेंत पुष्कळ मंडळी पाया पडूं लागली. मीही पाया पडण्याकरितां बाबांचे जवळ गेलें. सर्वजण पायावर डोकें ठेवून पाया पडत त्यामुळें बाबांस साहजिकच त्रास होई. व मग ते लोकांच्या अंगावर ओरडत व म्हणत " पायावर तास तास डोकें ठेवून पाया पडावयास पाहिजे ! व्हा दूर. जा निघा येथून. दुरून पाया पडले तर पाया पडणें नाहीं कां होत." मी मनांत म्हणाले कीं खरंच दूरून पाया पडलें म्हणून काय झालें ? दूरून पाया पडलें तर नाहीं का बाबांना पोंचत ? आपण आपलें दुरूनच पाया पडत जावें. दुसरे दिवशीं मी नित्याप्रमाणें वाटेंत पाया पडावयास गेले तों बाबा मजकडे पाहून म्हणाले " आपल्याला काय लांबून पाया पडले तर पोंचत नाहीं कीं काय ? आपण आपलें दुरूनच पाया पडावें." मला खुण पटली. व मी मग दुरूनच पायां पडूं लागले.

आपली नम्र भगिनी

ता. २८।१२।२४ आऊताई देव उर्फ पार्वतीबाई ओझरकर

---

ता. १६।८।१८

काल सबनीस आडनांवाचे गृहस्थ गुरुजी ( रा०रा० सीताराम यशवंत दळवी ) यांचे बरोबर आफिसांत आले होते. हे सबनीस शिरडीस महाराजांचे दर्शनास गेले होते. निघतांना त्यांचे जवळ पैसे नव्हते. त्यांनीं कांहीं मंडळीजवळ मागितले पण कोणी कांहीं दिले नाहींत. फक्त बापुसाहेब जोगांनीं एक रुपया दिला. महाराजाजवळ त्यांनीं मागितले. महाराज म्हणाले

...बहोत देगा." कोपरगांवास ते चालतच गेले. त्यांनीं स्टेशन मास्तरला ...पली स्थिती सांगितली. मास्तरांना शिरडीहून सवनीस आल्याचें कळल्या... ते पुढें कांहींच बोलले नाहींत. सवनीस गाडी आल्यावर तींत बसले ते ...डास जाऊन, तेथून पुण्यास जाऊन, तेथून बेळगांवास गेले त्यांना ...णींही अडविलें नाहीं. बेळगांवाहून सावंतवाडीस चालत गेले. मध्यें पाय ...तिशय दुखूं लागले त्यावर उदीचा प्रयोग केला. व त्यानेंच ते बरे झाले.

---

पुणें शहरचे रहिवासी रा. रा. काशिनाथ शंकर डुवे यांचे चिरंजिव रा. ...घुनाथ डुवे यांना श्रीचा अनुभव खालीलप्रमाणें आला आहे:—

पुणें शहरीं सन १९१३–४ सालीं प्लेग झाला त्यावेळेस शहरांतील जवळ जवळ सर्व माणसें बाहेर राहण्यास गेलीं होतीं परंतु डुवे यांनीं श्रीचे-चरणांवर भरंवसा ठेवून आपलें गणश पेठेंतील बिऱ्हाड हालविलें नाहीं. पुढें थोडक्याच दिवसांत या पेठेंतही प्लेगची बरीच धामधूम दिसतांच डुवे यांनीं त्यांचे चिरंजिव रघुनाथ यांस व त्याचे कुटुंबास सासुरवाडीस जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते उभयतां मुलास घेऊन निघाले. यापूर्वी शिरडीस श्रीचे दर्शनास जाण्यास उभयतांनीं संकल्प केला असून तो विसरून सासुरवाडीस तसेच निघाले; दौंड स्टेशन येईपावेतों त्यांचे तान्ह्या मुलाची प्रकृती उत्तम होती. परंतु सदरील स्टेशन ओलांडतांच मुलाची प्रकृती एकदम बिघडून मुलगा फार हैराण झाला. नवलगुदास ( सासुरवाडीस ) पोहोंचतांच त्याचें प्राणोत्क्रमण झालें, व त्यांचे कुटुंबास अतिशय ताप भरला. तो ताप प्लेगचा असून, बाई सात महिन्यांची गरोदर होती. सबब कांहीं औषधोपचारही करतां येईना. तिकडे कर्नाटकी भाषा असलेली रघुनाथ डुवे यानां येत नव्हती व त्यांचे सासुरवाडींत कोणी वडील मनुष्य नसल्यानें सदरी प्रसंगाचा सर्व भार रघुनाथ डुवे यांजवर पडला. गांवांत कोणाची ओळख नव्हती तरी एका मनुष्यास गांठून एका नामांकित वैद्यास आणलें व त्यानें सर्व लक्षणें पाहून अभिप्राय दिला कीं या प्रसंगांतून हा रोगी बांचणें कठीण आहे व गरोदरपणाचे स्थितींत औषधोपचार

करतां येत नाही. अशा भयंकर पेचांत रघुनाथ दुबे सांपडले असतां देहभान विसरून श्रीचे चरणांचा धांवा एकनिष्ठपणें करण्यास आरंभ केला. नंतर त्याच दिवशीं दुपारीं सुमारें ४ वाजतां श्रीची मूर्ती स्वतः उत्तरेच्या दरवाजानें आंत येऊन एका चौरंगावर विराजमान झाली व कृपादृष्टीनें रोग्याकडे पाहून कमंडलूंतून तीर्थ घेऊन रोग्याच्या तोंडांत घालून अंगावरून हात फिरविला व कफनींतून उदी काढून रोग्याच्या भालप्रदेशीं लावून पुनः सर्वांगावरून हात फिरवून म्हणाले कीं " बोलल्याप्रमाणें करावें. न केल्यास त्याचें प्रायश्चित्त असें भोगावें लागतें " असें म्हणत आहेत इतक्यांत पलीकडचे दालनांत लहान मुलांचा गोंगाट कानीं ऐकूं येऊन श्री रघुनाथ दुबे यांचे लक्ष तिकडे जाऊन पुन्हां पाहतात तों श्रीची मूर्ती अदृश्य झाली; हें पाहून त्यांचा कंठ दाटून आला व वृत्ती साशंकित झाली की ज्यांचे आपण इतक्यांत चिंतन करीत होतो व ते आल्याबद्दलचा फक्त भास झाला असावा परंतु रोग्याच्या भाल प्रदेशीं उदीचा पट्टा दिसला. तेव्हां त्यांची खात्री झाली कीं श्रीची स्वारी स्वतः आली होती. असो नंतर त्याच दिवशीं रात्रीं ८-९ चे दरम्यांन ताप कमी होऊं लागून दुसरे दिवशीं प्रकृती निखालस बरी होऊन बाईनें स्वतः स्वयंपाक केला.

पुढें थोडक्यांच दिवसांत ते उभयतां शिरडीस श्रीचे दर्शनास गेले, त्यावेळेस श्री समर्थांनीं ह्या गोष्टीची ओळख दिली. त्याचवेळीं पद म्हणण्यांत आलें तें:—

## ॥ पद ॥

देह जावो अथवा राहो श्री गुरुपदी माझा पूर्णची भाव ॥ ध्रु० ॥<br>
सदानंद सुखदायक गुरूला, प्रेमभावें पुजीन त्याला ॥ १ ॥<br>
पुजूनी त्यासी हृदयीं सांठविलें निजरूपी मन गुंगची झालें ॥२॥<br>
त्या पूर्ण ब्रह्मा हृदई सांठवितां, सहजची मुक्ती मिळेची तत्वतां॥३॥<br>
दास म्हणे त्या गुरुपदासी, अहोरात्र स्मरणा लावीन मनासी ॥४॥

रा. रा. श्रीसाईलीलाकर्ते यांस:—

कृ. शि. सा. न. वि. विशेष. आपल्या सुंदर श्रीसाईलीलेच्या एखादे अंकांत खालील श्रीसाईनाथ करुणाष्टकास व लीलावताराष्टकास स्थान मिळण्यास सविनय प्रार्थना आहे.

## भुजंगप्रयात.

नसे अंतरीं वास त्वद्देवराया ।
कधीं वंदिलें भक्तिनें नाहिं पाया ॥
कशी कंठुं संसारि या दीर्घकाळा ।
पदा वंदितें साइजी देवबाला ॥ १ ॥

दयांबोनिधे गोकुळीं कृष्ण झाला ।
जना दावण्या " भक्तिचा मी भुकेला " ॥
नसे शक्ति वर्णावया रम्य लीला ।
करी जानकी बालिका वंदनाला ॥ २ ॥

तरूं केविं तोडोनिया मोहपाशा ।
कशी सोडवूं गुंतवी चित्त आशा ॥
दया याचितें नाशि जी सर्व चिंता ।
पदीं बालकृष्णात्मजा ठेवी माथा ॥  ॥

रिपू गांजिती कामक्रोधादि भारी ।
भवाब्धीमध्यें चित्त घेई भरारी ॥
निराशा सदा शांति जाई लयाला ।
प्रभी सोडवी प्रार्थिते देवबाला ॥ ४ ॥

---

१. आपण गोकुळांत कृष्ण झालांत म्हणजे आपण गोकुळांत जो जन्म घेतला तो केवळ " मी भक्तीचा भुकेला आहें " हें प्रत्यक्ष दाखविण्याकरितांच.

चमत्कार दावोनि नाना जनाला ।
किती उद्धरीले नसे मोज त्याला ॥
उदी तीर्थ घेतां समाधान चित्ता ।
नमस्कार पादांबुजीं साईनाथा ॥ ५ ॥

कुणा सांगतां जाऊनी स्वप्निं कांहीं ।
कुणा दावितां गम्य ना देवताही ॥
जसा भाव ज्याचा तशी होत मूर्ती ।
पदीं बालिका लीन ऐकोनि कीर्ती ॥ ६ ॥

नको द्रव्य ठेवा नको मोक्ष केवा ।
पदा दाउनी देइ आतां विसावा ॥
अती क्षीण हा सोसवेना मनाला ।
कृपा सागरा दाखवी सत्पथाला ॥ ७ ॥

विटेना कदा चित्त, हें सर्व खोटें ।
जरी बोंचती दुःख दुर्दैव कांटे ॥
बहू नाडिती गर्व दंभादि माया ।
पुरे सोडवी, दाखवी दिव्य पाया ॥ ८ ॥

## शार्दूलविक्रीडित.

लक्ष्मी चूरित पादपद्म स्वकरें जेथें मुनी तिष्ठती ।
ब्रह्मानंद मिळावया स्वरूप जें योगी सदा चिंतिती ।
कोणी सेविती धूम्र कोणि करिती अष्टांग ही साधनें ।
साईरूप धरीत भक्तहृदिचें फेडावया पारणें ॥ १ ॥

---

२. आपण कोणास अशा कांहीं गोष्टी सांगतां कीं त्या प्रत्यक्ष
वांना सुद्धा कळणें अशक्य असतें.

## मालिनी.

हलहल हृदिं ठेवी भस्म चर्चीत आंगा ।
विलसत शशि भालीं मस्तकीं दिव्य गंगा
स्वरूपिं निज सदां जो राही तल्लीन वात्रा ।
धरित स्वरूप साई पाहुनी भक्तभात्रा ॥ २ ॥

## भुजंगप्रयात.

ध्रुवाकारणें देव साकार झाला ।
हृदीं लाथ साहोनि वंदी भ्रुगूला ।
जनी कारणें कांडितो देवराया ।
धरी साईरूपा करी दूर माया ॥ ३ ॥

## वसंततिलका.

सारथ्य अर्जुनरथीं करि अश्वसेवा ।
जो रुक्मिणी हृदयिचा बहुमोल ठेवा ।
जो गोकुळीं अधरिं वाजवि गोड पावा ।
तो शेरडीमधिं धरी प्रभु "साइ" नांवा ॥ ४ ॥

रेड्यामुखीं वदवि जो विभु वेद चारी ।
जो नंदमंदिरिं सुखें हरि गाइ चारी ।
नामा जया वदनिं घालित भक्ति घासा ।
गोदातटीं पुरवि तो प्रभु भक्त आशा ॥ ५ ॥

## शार्दूलविक्रीडीत.

प्रल्हादास्तव स्तंभि जो प्रगटला मारावया दुर्जना ।
घेई मोहिनिरूप दैत्य वधिला दावीत लीला जना ।

दामाजीस्तव मोंगली धरि शिरीं जासूद हा सांवळा ।
प्रार्थी देवसुता हरी भवभया साई प्रिया प्रेमला ॥ ६ ॥

ता. २९।११।२४ आपली दुहिता व बाबांची वत्सा

देवबाला.

रा. रा. श्री साई लीलाकर्ते यांस कृ. शि. सा न. वि. विशेष.

श्री सद्गुरु साईनाथ बाबांची संस्कृत पद्यरूपीं सेवा करण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. एकच कविता केली आहे. व ती आपल्याकडे पाठवीत आहे. तिचा अव्हेर न करितां तिला आपल्या एखादे श्री साई-लीलेच्या अंकांत स्थान द्याल अशी आशा आहे.

## मंदाक्रांता.

दृष्ट्वैश्वर्यं तव ममगति र्मूढभावं प्रपदे ।
नाहं शक्तस्तव च विभवं गातु मत्यल्प बुद्ध्या ।
क्वेशः साई त्रिभुवन पतिः क्वाऽर्भकोऽयंच दासः ।
श्रीपादस्य प्रथम नमनं स्वी कुरुष्वेति वांछा ॥ १ ॥

अर्थ–आपुले ऐश्वर्य पाहून माझी बुद्धी गुंग होऊन गेली. आपल्या वैभवाचें वर्णन करण्यास माझी अल्पमति असमर्थ आहे. आपण त्रैलोक्याचे मालक परमात्मा साई कोणीकडे व मी हा दासवत्स कोणीकडे. ( तथापि ) श्रीपादाचे ( माझ्या ) प्रथम वंदनाचा आपण स्वीकार करावा अशी ( माझी ) इच्छा आहे.

ता. ११।१२।२४ आपला नम्र, व बाबांचा वत्स,

देवसुत.



ह. भ. प. दासगणू महाराजांचे शिष्य

कै. दामोदर वामन आठवले उर्फ दामुअण्णा.

ह. भ. प. दासगणु महाराजांचे शिष्य रा. दामोदर वामन आठवले उर्फ दामुअण्णा यांना पंढरपूर मुक्कामीं कफक्षयाच्या विकारानें पौष शुद्ध १० च्या दिवशी सकाळी देवाज्ञा झाली, हें कळविण्यास आम्हास अत्यंत खेद वाटत आहे. बहुतेक सर्व महाराष्ट्रांत व विशेष करून श्री साई महाराजांचे भक्तमंडळांत दासगणुमहाराज व त्यांचे शिष्य दामुअण्णा या दोन व्यक्तींना न ओळखणारा क्वचितच कोणी असूं शकेल व दामुअण्णांच्या अकालीं मृत्यूमुळें प्रत्येकाला हळहळ वाटेल. गेल्या रामनवमीच्या उत्सवांत शिरडीस दासगणुमहाराजांचें जें कीर्तन झालें तें दामुअण्णांचे साथीनें झालेलें दासगणु महाराजांचें शेवटचें कीर्तन. त्यावेळेपासूनच दामुअण्णांची प्रकृति खालावत चालली होती, व शेवटीं दुखणें क्षयावर जाऊन त्यांत त्यांचा अंत झाला.

दामु अण्णा हे मुळचे कोंकणचे राहणारे. घरची स्थिति गरीबीची म्हणून लहानपणींच विद्याभ्यास करण्याकरितां हे देशावर आले. वार लावून किंवा कोणाचे घरीं पूजा वगैरे करण्यास राहून विद्यार्जन करावें हा मनांतला हेतु. त्याप्रमाणें त्यांनीं मराठी शिकण्यास सुरवात केली. कल्याणचे कै. नानासाहेब चांदोरकर यांनीं दामुअण्णानां आश्रय दिला. दामु अण्णा हे साधारण देखणे असून त्यांचा आवाजही चांगला होता. यावेळीं दासगणू-महाराज हे एकटेच कीर्तन करित असत. त्यांना दामुअण्णाची जोड दिल्यास फार बहारीचें कीर्तन होईल असें नानासाहेबांस वाटून, त्यांनीं दामुअण्णांना दासगणु महाराजांचे स्वाधीन केलें. ही नानासाहेबांची योजना किती फलद्रूप झाली हें सर्वांनां माहीत आहेच. वास्तविक ही योजना श्री सद्गुरु साईमहाराजांचीच. नानासाहेब निमित्तमात्र झाले. सुंदर गोड आवाज, देखणेपणा या दोन गुणांमुळें दामुअण्णा लहानपणींच एखाद्या नाटक कंपनींत ओढले जावयाचे. नानासाहेबांकडे येण्यापूर्वी दामु अण्णा कांहीं दिवस पुण्यास एका प्रसिद्ध नाटक कंपनीशीं दृढ संबंध असलेल्या गृहस्थाकडे त्यांचे घरीं पूजा

करून त्यांने आश्रयाला होतेही, परंतु योगायोग दुसरा असल्यामुळे वर लिहिल्याप्रमाणें दासगणुमहाराजांचा व त्यांचा संबंध जडला.

दामुअण्णांचें मराठी शिक्षण चांगलें झालें होतें. त्यांची बाळबोध व मोडी अशीं दोन्हीं हस्ताक्षरें फार सुंदर होतीं. त्यांनीं थोडा संस्कृतभाषेचाही अभ्यास केला होता. त्यांची धारणाशक्ति फार विलक्षण होती. दासगणु महाराजांची सर्व आख्यानें व त्यांची १०० किंवा २०० हून अधिक श्लोक असलेलीं इतर काव्यें दामुअण्णाला मुखोद्गत होतीं. दामुअण्णा कविता करीत असत. त्यांची श्री समर्थ स'ईमहाराजांवरील पद्यें प्रसिद्धच आहेत. दामु अण्णा स्वत: कीर्तन फार चांगलें करीत असत. दासगणु महाराजांची कीर्तनपरंपरा त्यांनीं फार चांगली चालविली असती; परंतु त्यांच्या अकाली मृत्युमुळें एक चांगला होतकरू कीर्तनकार नाहीसा झाला.

दामुअण्णा दासगणु महाराजांना आपले गुरू मानीत असत. गुरू शिष्यांचें एकमेकावर फार प्रेम असे. त्यामुळें त्यांचा विरह दासगणु महाराजांना फार शोकास्पद वाटेल यांत शंका नाहीं. पण त्यांना व दामुअण्णांना ओळखणारा प्रत्येकजण त्यांच्या दु:खाचे वांटेकरी आहे, हें लक्षांत घेऊन त्यांनीं समाधान मानून घेतलें पाहिजे.

# अध्याय २९ वा.

श्रीगणेशायनमः। श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः। श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
श्रीसद्गुरु साईनाथायनमः

भूतभौतिक विषय जात। हें अखिल विश्वनिजांतर्गत ॥
दर्पणीं नगरीसें प्रतिबिंबित। मायाविजृंभित मायिक ॥ १ ॥
वस्तुगत्या अनुद्भूत। आत्मस्वरूपीं अनुस्यूत ॥
तें हें विश्वस्वरूपीं स्थित। दिसे उद्भूत चराचर ॥ २ ॥
जें जें कांहीं आरिसां दिसे। तें तें वास्तव तेथें नसे ॥
जैसें वासनामय निद्रेंत आभासे। परी तें नासे प्रबोधीं ॥ ३ ॥
जाग्रदावस्था प्राप्तकाळें। स्वप्नोपलब्ध प्रपंच वितळे ॥
अद्वयानंदप्रकाश विवळे। महावाक्य मेळें सद्गुरूच्या ॥ ४ ॥
विश्वाचें जें सत्ता स्फुरण। तयांचें अन्य निरपेक्ष अधिष्ठान ॥
तो गुर्वात्मा ईश्वर जैं प्रसन्न। तयींच साक्षात्करण हें ॥ ५ ॥
स्वप्रकाश सदात्मक। तें हें आत्मस्वरूप देख ॥
तेथें हें विश्व भूतभौतिक। माया कौतुक हा खेळ ॥ ६ ॥

---

१ आरशांत. २ शहरासारखें. ३ मायेचा देखावा. ४ खरोखर पाहतां. ५ प्रकट झालेलें नाहीं. ६ ओंविलेलें. ७ आरशांत. ८ वस्तुतः ९ जागृती आल्यावर. १० प्रकट होतो.

आब्रह्मस्तंबपर्यंत । भूतभौतिक हें सर्व कल्पित ॥
ऐसें हें विस्तारलें जगत । मायाविजृंभित केवळ ॥ ७ ॥

सर्प माला दंड धारा । स्वरूपाज्ञानें मानिती दोरा ॥
तैसाचि हा सकळ जगत्पसारा । स्वरूपीं थारा नाहीं या ॥ ८ ॥

हें दृश्य जात मायामय । तत्वज्ञानें यासीं लय ॥
गुरुवाक्य प्रबोधसमय । प्राप्त होय त्याकाळीं ॥ ९ ॥

त्रितीय पुरुष एकवचनी । ' गृणाति ' रूपार्थ धरितां मनीं ॥
शिष्यास तत्वोपदेशदानीं । गुरु एक जनीं समर्थ ॥ १० ॥

म्हणवूनि प्रार्थूंकीं वावांप्रत । करवी बुद्धि अंतरासक्त ॥
नित्यानित्य विवेक युक्त । वैराग्यरत मज करी ॥ ११ ॥

मी तो सदा अविवेकी मूढ । आहे अविद्याव्यवधाननिगूढ ॥
बुद्धी सर्वदा कुतर्कारूढ । तेणेंचि हें गूढ पडलें मज ॥ १२ ॥

गुरुवेदांत वचनीं भरंवसा । ठेवीन मी अढळ ऐसा ॥
करी मन जैसा आरसा । निज बोध ठसा प्रकटेसा ॥ १३ ॥

वरी सद्गुरो साई समर्था । करवी या ज्ञानाची अन्वर्थता ॥
विना अनुभव वाचा विग्लापनता । काय परमार्था सांधील ॥ १४ ॥

म्हणोन बाबा अपुल्या प्रभावें । हें ज्ञान अंगें अनुभवावें ॥
सहज सायुज्य पद पावावें । दान हें द्यावें कृपेनें ॥ १५ ॥

तदर्थ देवा सद्गुरुसाई । देहाहंता वाहतों पायीं ॥
आतां येथून तुझें तूं पाहीं । मीपण नाहींच मजमाजी ॥ १६ ॥

घेई माझा देहाभिमान । नलगे सुखदुःखाची जाण ॥
इच्छेनुसार निजसूत्रां चालन । देऊनि मन्मन आवरी ॥ १७ ॥

---

१ स्वस्वरूपाच्या यथार्थ ज्ञानाचे अभावीं, २ तोंडाची बडबड.

अथवा माझें जें मीपण । तेंचि स्वयें तूं होऊनि आपण ॥
घेई सुखदुःखाचें भोक्तेपण । नको विवंचन मज त्याचें ॥ १८ ॥
जयजयाजी पूर्णकामा । जडो तुझियाठायीं प्रेमा ॥
मन हें चंचल मंगलधामा । पावो उपरमा तव पायीं ॥ १९ ॥
तुज वांचूनि दुजा कोण । सांगेल आम्हास हितवचन ॥
करील अमुचें दुःखनिरसन । समाधान मनाचें ॥ २० ॥
दैव शिरडीचें म्हणून झालें । बाबा तेथें आगमन आपुलें ॥
पुढें तेथेंच वास्तव्य केलें । क्षेत्रत्व आणिलें त्या स्थाना ॥ २१ ॥
धन्य शिरडीचें सुकृत । कीं हा साई कृपावंत ॥
करी या स्थळा भाग्यवंत । अलंकृत निजवास्तव्यें ॥ २२ ॥
तूंचि माझा चेतविता । तूंचि माझी वाचा चाळिता ॥
तैं मी कोण तव गुण गाता । कर्ताकरविता तूं एक ॥ २३ ॥
तुझा नित्य समागम । हाचि आम्हा आगमनिगम ॥
तुझें नित्य चरित्रश्रवण । हेंच पारायण आमुतें ॥ २४ ॥
अनिमेष तुझें नामावर्तन । हेंच आम्हा कथा कीर्तन ॥
हेंचि आमुचें नित्यानुसंधान । हेंचि समाधान आम्हांतें ॥ २५ ॥
नलगे आम्हां ऐसें सुख । जेणें होऊं भजन विन्मुख ॥
याहून अधःपतन तें अधिक । परमार्थ बाधक काय असे ॥ २६ ॥
आनंदाश्रू उष्ण जीवन । करूं तेणें चरणक्षालण ॥
शुद्ध प्रेम चंदन चर्चन । करवूं परिधान सत्श्रद्धा ॥ २७ ॥
हें अंतरंग पूजा विधान । बाह्योपचार पूजेहून ॥
एणें तुज सुप्रसन्न । सुखसंपन्न करूं कीं ॥ २८ ॥
सात्वीक अष्टभाव कमल । अष्टदल अतीव निर्मल ॥
मन करून एकाग्र अविकल । वाहूं निजफल संपादूं ॥ २९ ॥

---

१ एक निमिष व्यर्थ न जातां.

लावूं भावार्थ बुका भाळा । बांधूं दृढ भक्तीची मेखळा ॥
वाहूं पदांगुळींगळा । भोगूं सोहळा अलौलिक ॥ ३० ॥

प्रीति रत्नालंकारमंडण । करूं सर्वस्व निंबलोण ॥
करूं भक्तिचामरांदोलन । तापनिवारण तन्मय छत्रें ॥ ३१ ॥

समर्पूं ऐसी स्वानंदपूजा । अष्टभाव गंध अर्गजा ॥
ऐसे आम्ही आमुच्या काजा । साईराजा पूजूं तुज ॥ ३२ ॥

अभीप्सितार्थ सिद्ध्यर्थ । स्मरूं नित्य "साईसमर्थ" ॥
याच मंत्रें साधूं परमार्थ । होऊं कृतार्थ निजनिष्ठा ॥ ३३ ॥

पूर्वील अध्यायीं कथन । साई समर्थ दयाघन ॥
साधावयास निज भक्त कल्याण । कैसें शिक्षण ते देत ॥ ३४ ॥

आतां ये अध्यायीं निरूपण । भक्तां स्वगुरुपदीं स्थापन ॥
कवणें परी करीत जाण । कथाविंदान तें परिसा ॥ ३५ ॥

गताध्यायांतीं निदर्शित । भक्तपंतकथामृत ॥
श्रोतां परिसिजे दत्तचित्त । तत्व निश्चित व्हावया ॥ ३६ ॥

कैसे कैसे अनुभव दाविले । कैसे नेत्रीं निष्ठांजन सूदिलें ॥
कैसें स्वगुरुपदीं अढळ केलें । मन निवालें कैसेंनीं ॥ ३७ ॥

एकदां एक बहुत श्रमें । भक्त एक पंत नामें ॥
गेले शिरडीस मित्र समागमें । दर्शनकामें साईच्या ॥ ३८ ॥

ते पूर्वील अनुगृहीत । होते निज गुरुपदीं स्थित ॥
शिरडीस जावें किंनिमित्त । झाले शंकित मानसीं ॥ ३९ ॥

तथापी जयाचा जैसा योग । तैसा अकल्पित घडतो भोग ॥
आला साईदर्शनाचा ओघ । जाहला अमोघ सुखदायी ॥ ४० ॥

आपण कल्पावी एक योजना । ईश्वराच्या आणीकचि मना ॥
अदृष्टापुढें कांहीं चालेना । तें स्वस्थ मना परिसिजे ॥ ४१ ॥
ठेवूनिया शिरडीचें प्रस्थान । कित्येक जन निज स्थानाहून ॥
निघाले अग्निरथीं बैसून । सकळ मिळून आनंदें ॥ ४२ ॥
गाडींत जैं हे चढले अवचित । तेथेंच होते स्थित हे पंत ॥
शिरडीस जाण्याचा तयांचा बेत । झाला अवगत पंतांस ॥ ४३ ॥
मंडळींत कांहीं पंताचे स्नेही । त्यांतची कांहीं विहिणी व्याही ॥
पंतांचे मनांत जाणें नसतांही । बळेंच आग्रहीं सांपडले ॥ ४४ ॥
आरंभी पंतांचा विचार । जाणें होतें जेथवर
तिकीटही तयांचें तेथवर । पुढें तो विचार बदलला ॥ ४५ ॥
स्नेही व्याही म्हणती चला । जाऊं समवेत कीं शिरडीला ॥
मनीं नसतांही आग्रहाला । होकार दिधला पंतांनीं ॥ ४६ ॥
पंत उतरले विरारास । मंडळी गेली मुंबईस ॥
उसनें घेऊनि खर्चावयास । पंतही मुंबईस मग गेले ॥ ४७ ॥
मोडवेना मित्रांचें मन । मिळविलें निज गुर्वनुमोदन ॥
आले मग ते शिरडीलागून । सकळ मिळूनि आनंदें ॥ ४८ ॥
गेले सर्व मशीदीस । सकाळीं अकराचे समयास ॥
दाटी भक्तांची पूजनास । पाहूनि उल्हास वाटला ॥ ४९ ॥
पाहूनि बाबांचें ध्यान । जाहले सकळ आनंदसंपन्न ॥
इतक्यांत पंतास झीट येऊन । बेशुद्ध होऊन ते पडले ॥ ५० ॥
पातली जीवास विकलता । पावले सबल निचेष्टता ॥
सांगातियां उद्भवली चिंता । अति व्यग्रता मानसीं ॥ ५१ ॥
मंडळीची मदत मोठी । साई बाबांची कृपादृष्टी ॥
करितां मस्तकीं उदक वृष्टी । गेली निचेष्टितता समूळ ॥ ५२ ॥

होऊनियां सावधान । उठूनि बैसले खडबडोन ॥
वाटले जणू झोपेंतून । आतांच उठून बैसले ॥ ५३ ॥
बाबा पूर्ण अंतर्ज्ञानी । तयाची गुरुपत्रता जाणूनी ॥
तयास अभयता आश्वासूनि । निज गुरुभजनीं स्थापिती ॥ ५४ ॥
येवो म्हणती प्रसंग कांहीं । “ आपना तकिया छोडना नहीं ” ॥
सदासर्वदा निश्चळ राही । अनन्य पाहीं एकत्वीं ॥ ५५ ॥
पंताळा ती पटली खूण । निज गुरूचें जाहलें स्मरण ॥
साईबाबांचें कनवाळूपण । राहिलें स्मरण जन्माचें ॥ ५६ ॥
तैसेच एक मुंबापुरस्थ । हरिश्चंद्र नामें गृहस्थ ॥
पुत्र अपस्मार व्यथाग्रस्त । तेणें अति त्रस्त जाहले ॥ ५७ ॥
देशी विदेशी वैद्य झाले । कांहीं एक उपाय न चले ॥
पाहून सर्वांचे प्रयत्न हरले । राहतां राहिले साधुसंत ॥ ५८ ॥
सन एकोणीससें दहा सालीं । दास गणूंचीं कीर्तनें झालीं ॥
श्री साईनाथांची कीर्ति पसरली । यात्रा वाढली शिरडीची ॥५९॥
कुग्राम परी भाग्यें थोर । शिरडी झाली पंढरपूर ॥
महिमा वाढला अपरंपार । यात्रा अपार लोटली ॥ ६० ॥
रोग घालविती केवळ दर्शनें । अथवा केवळ हस्तस्पर्शनें ॥
अथवा शुद्ध कृपावलोकनें । आले अनेका अनुभव ॥ ६१ ॥
होतां अनन्य शरणागत । कृत कल्याण पावत भक्त ॥
जाणूनि सकळांचें मनोगत । पुरवीत मनोरथ सर्वांचें ॥ ६२ ॥
उदी धारणें पिशाचें पळतीं । आशिर्वचनें पीडा टळती ॥
कृपा निरीक्षणें बाधा चुकती । लोक येती धांवोनीं ॥ ६३ ॥
ऐसें महात्म्य कथाकीर्तनीं । दास गणूंच्या ग्रंथांतूनीं ॥
ऐकोनी या कर्णोपकर्णीं । उत्कंठा दर्शनीं उदेली ॥ ६४ ॥

सर्वं घेऊनि मुलेंबाळें । नानाविध उपायनें फळें ॥
आले शिरडी ग्रामास पितळे । पूर्णाजैतवळें दर्शना ॥ ६५ ॥
मुलास पायांवरी घातलें । स्वयें बाबांस लोटांगणीं आले ॥
तों तेथ एक विपरीत वर्तलें । पितळे गडबडले अत्यंत ॥ ६६ ॥
दृष्टादृष्ट साईंची होतां । मुलगा पावला बेशुद्धावस्था ॥
डोळे फिरविले पडला अवचिता । मातापिता गडबडले ॥ ६७ ॥
पडिला विसंज्ञ भूमीसी । तोंडासि आली उदंड खरंसी ॥
चिंता ओढवली मातापित्यासीं । काय दैवासीं करावें ॥ ६८ ॥
निघूनि गेला वाटे श्वास । तोंडावाटे चालला फेंस ॥
फुटला घाम सर्वांगास । सरली आस जीविताची ॥ ६९ ॥
ऐसे झटके अनेक वेळां । पूर्वीं येऊनि गेले मुलाला ॥
परी न इतुका विलंब झाला । प्रसंगाला एकाही ॥ ७० ॥
हा न भूतो न भविष्यति । त्यानें आणिली प्राणांतिक गति ॥
मातेच्या डोळां अश्रू न खळती । पाहूनि स्थिति बाळाची ॥ ७१ ॥
आलों किमर्थ झालें काय । उपाय तो झाला अपाय ॥
ऐसे घातुक व्हावे हे पाय । व्यर्थ व्यवसाय झाला कीं ॥ ७२ ॥
घरांत रिघावें चोरा भेणें । तों घरचि अंगावरी कोसळणें ॥
तैसेंच कीं हें अमुचें येणें । झालें म्हणे ती बाई ॥ ७३ ॥
व्याघ्र भक्षील म्हणूनि गाई । जीवा भेणें पळूनि जाई ॥
तिजला मार्गांत भेटे कसाई । तैसेंच पाही जाहलें ॥ ७४ ॥
उन्हांत तापला पांथस्थ । वृक्षच्छायेस जों विसावत ॥
तों वृक्षचि उन्मळूनि पडत । झाली ते गत तयांसीं ॥ ७५ ॥

---

१ शेट हरिश्चंद्र पितळे. २ फेंस. ३ श्री सांईबाबांचे पाय.

भाव ठेऊनि देवापरी । पूजेस जातां देऊळवाडीवरी ॥
देऊळचि कोसळे अंगावरी । तरीच परी हे आली ॥ ७६ ॥
बाबा मग तयां आश्वासिती । धीर धरावा थोडा चित्तीं ॥
मुलास उचलूनि न्या निगुती । निजावसथीं[1] तो आथंबळ ॥ ७७ ॥
मुलास घेऊनि जा बिऱ्हाडीं । आणीक एक भरतां घडी ॥
सजीव होईल तयाची कुडी । उगीच तांतडी करूं नका ॥ ७८ ॥
असो पुढें तैसें केलें । बोल बाबांचे खरे झाले ॥
पितळे सहकुटुंब आनंदले । कुतर्क गेले विरोन ॥ ७९ ॥
वाड्यांत नेतां तो कुमर । तात्काळ आला शुद्धीवर ॥
मातापितयांचा फिटला घोर । आनंद थोर जाहला ॥ ८० ॥
मग पितळे स्त्रियेसहित । बाबांचिया दर्शना येत ॥
करीत साष्टांग प्रणिपात । अति विनीत होऊनी ॥ ८१ ॥
उठला पाहूनि आपुला सुत । साभार मानसीं आनंदित ॥
बसले बाबांचे चरण चूरित । बाबा सस्मित पूसती ॥ ८२ ॥
कां त्या संकल्प विकल्प लहरी । शांत झाल्या का आतां तरी ॥
ठेवील निष्ठा धरील सबूरी[2] । तयासी श्रीहरी रक्षील ॥ ८३ ॥
पितळे मूळचेच श्रीमंत । घरंदाज लौकीकवंत ॥
मेवा मिठाई लुटवीत । बाबांस अर्पित फळ पान ॥ ८४ ॥
कुटुंब तयांचें फार सात्विक । प्रेमळ श्रद्धाळू भाविक ॥
बाबांकडेस लावूनि टक । खांबानिकट बैसतसे ॥ ८५ ॥
पहातां पहातां डोळे भरावे । ऐसें तिनें नित्य करावें ॥
पाहूनि तत्प्रेमाचे नवलावे । अत्यंत भुलावें बाबांनीं ॥ ८६ ॥
जैसे देव तैसेच संत । भक्त पराधीन ते अत्यंत ॥
अनन्यत्वें तयां जे भजत । कृपावंत तयांवरी ॥ ८७ ॥

---

१ त्याची शुद्धी. २ धैर्य.

असो ही मंडळी जावया निघाली । मशीदीस दर्शनार्थ आली ॥
बाबांची अनुज्ञा उदी घेतली । तयारी केली निघावया ॥ ८८ ॥

इतुक्यांत बाबा काढिती तीन । रुपये आपुले खिशांतून ॥
पितळ्यांस निकट बोलावून । बोलती वचन तें परिसा ॥ ८९ ॥

बापू तुजला पूर्वीं दोन । दिधलेती म्यां त्यांत हे तीन ॥
ठेवूनि यांचें करी पूजन । कृतकल्याण होसील ॥ ९० ॥

पितळे रुपये घेती करीं । प्रसाद जाणोनि आनंदें स्वीकरी ॥
लोटांगणीं येत पायांवरी । म्हणती कृपा करी महाराजा ॥ ९१ ॥

मनीं उद्भेली विचार लहरी । माझी तों ही प्रथम फेरी ॥
बाबा हें वदती काय तरीं । हें मज निर्धारीं कळेना ॥ ९२ ॥

बाबांस पूर्वीं नाहीं देखिलें । पूर्वीं दोन कैसे दिधले ॥
अर्थावबोध कांहींच न कळे । विस्मित पितळे मनिं झाले ॥ ९३ ॥

कैसी व्हावी परिस्फुटता । वाढली मनाची जिज्ञासुता ॥
बाबा न लागूं देत पत्ता । राहिली मग्धता तैसीच ॥ ९४ ॥

संत सहज उद्गारले जरी । तरी ते वाणी होणार खरी ॥
जाणीव ही पितळ्यांचे अंतरीं । म्हणून विचारीं ते पडले ॥ ९५ ॥

परी पुढें हे मुंबापुरीं । गेले जेव्हां आपुले घरीं ॥
होती घरांत एक म्हातारी । जिज्ञासा पुरी ती करी ॥ ९६ ॥

म्हातारी पितळ्यांची माता । सहज शिरडीचा वृत्तांत पुसतां ॥
निघाली तीन रुपयांची वार्ता । संबंध कथा जुळेना ॥ ९७ ॥

विचार करितां स्मरण झालें । मग म्हातारी पितळ्यांस बोले ॥
आतां मज यथार्थ आठवलें । बाबा बोलले सत्य तें ॥ ९८ ॥

---

१ या नांवानें श्री साईबाबा 'कोणाला' मोठ्या प्रेमानें संबोधित
२ दिले होते.

आतां त्वां तुझ्या मुलास नेलें । शिरडीस साईचें दर्शन करविलें ॥
तैसेंच पूर्वी तुज पित्यानें वहिलें । होतें नेलें अक्कलकोटीं[१] ॥ ९९ ॥
तेथील महाराजही सिद्ध । परोपकारी सदा प्रसिद्ध ॥
अंतर्ज्ञानी योगी प्रबुद्ध । पिताही शुद्ध आचरणीं ॥ १०० ॥
घेवोनि तव पित्याची पूजा । प्रसन्न झाला योगीराजा ॥
दोन रुपये प्रसादकाजा । दिधले पूजा कराया ॥ १०१ ॥
हे ही पूर्वील रुपये दोन । स्वामींनीं बाळा तुज लागोन ॥
दिधले होते प्रसाद म्हणून । पूजनार्चन करावया ॥ १०२ ॥
तुमचें देव देवतार्चन । त्यांत हे होते रुपये दोन ॥
करीत असत नेमें पूजन । अति निष्ठेनें वडिल तुझे ॥ १०३ ॥
तयांची निष्ठा मी एक जाणें । वागत गेले निष्ठेप्रमाणें ॥
तयांच्या पश्चात पूजा उपकरणें । जाहलीं खेळणी मुलांची ॥ १०४ ॥
निष्ठा उडाली देवावरची । लाज वाटूं लागली पूजेची ॥
पूजेसि योजना झाली मुलांची । दाद रुपयांची कोण घेई ॥ १०५ ॥
ऐसीं कित्येक वर्षें लोटलीं । रुपायांची त्या बेदाद झाली ॥
आठवणही साफ बुजाली । जोडी हरवली रूपयांची ॥ १०६ ॥
असो तुमचें भाग्य मोठें । साईमिषें महाराजेंचि भेटे ॥
पुसावया विस्मरणांचीं पुटें । तैसींच संकटें निरसाया ॥ १०७ ॥
तरी आतां येथूनि पुढें । सोडूनि द्यावे तर्क कुडे ॥
पहा आपल्या पूर्वजांकडे । नको वांकडे व्यवहार ॥ १०८ ॥
करीत जा रुपयांचें पूजन । संतप्रसाद माना भूषण ॥
समर्थ साईनीं ही पटविली खूण । पुनरुज्जीवन भक्तीचें ॥ १०९ ॥
ऐकतां ही मातेची कथा । परमानंद पितळ्यांचे चित्ता ॥
ठसली साईची व्यापकता । आणि सार्थकता दर्शनाची ॥ ११० ॥

---

१ अक्कलकोटचे स्वामी.

मातेचें तें शब्दामृत । नाही भावना करी जागृत ॥
देई पश्चात्ताप प्रायश्चित्त । भावी हित दर्शवी ॥ १११ ॥
असो होणार होऊनि गेलें । पुढील कार्यार्थ संतीं जागविलें ॥
मानूनि तयांचे उपकार भले । सावध राहिले निजकार्यी ॥ ११२ ॥
ऐसीच एक आणीक प्रचीती । कथितों परियेसा स्वस्थ चित्तीं ॥
भक्तांच्या उच्छृंखल मनोवृत्ती । बाबा आवरिती कैशा तें ॥ ११३ ॥
गोपाळ नारायण आंबडेकर । नामें एक भक्त प्रवर ॥
आहे बाबांचा पुणेकर । परिसा सादर तत्कथा ॥ ११४ ॥
आंग्लभौम सरकार पदरीं । अबकारी खात्यांत होती नोकरी ॥
दहा वर्षें भरतां पुरीं । बैसले घरीं सोडूनी ॥ ११५ ॥
दैव फिरलें झालें पारखें । सर्व दिवस नाहींत सारखे ॥
आले ग्रहदशेचे गरके । कोण फरके न भोगितां ॥ ११६ ॥
आरंभीं ठाणें जिल्ह्यांत नोकर । पुढें नशीबीं आलें जव्हार ॥
होते जेथें अम्मलदार । तेथेंच बेकार जाहले ॥ ११७ ॥
नोकरी आळवावरचें पाणी । पुनश्च पडावें कैसें ठिकाणीं ॥
प्रयत्नाची शिकस्त त्यांनीं । पाहिली करूनी त्यावेळीं ॥ ११८ ॥
परी न आलें तयासीं यश । निश्चय ठरला रहावें स्ववश ॥
आपत्तींचा झाला कळस । जाहले हताश सर्वांपरी ॥ ११९ ॥
वर्षोनवर्ष खालीं खालीं । सांपत्तिक स्थिति खालावली ॥
आपत्तीवर आपत्ती आली । दुःसह झाली गृहस्थिती ॥ १२० ॥
ऐसीं गेलीं वर्षें सात । सालोसाल शिरडीस जात ॥
बाबांपुढें गाऱ्हाणें गात । लोटांगणी येत दिनरात्र ॥ १२१ ॥
एकोणीससें सोळा सालांत । वैतागून गेले अत्यंत ॥
वाटलें करावा प्राणघात । शिरडी क्षेत्रांत जाऊनी ॥ १२२ ॥

कुटुंब समवेत या समयास । राहिले शिरडीस दोन मास ॥
काय वर्तलें एके निशीस । तया वार्तेस परिसेसा ॥ १२३ ॥
दीक्षितांचे वाड्यासमोर । एका बैलाचे गाडीवर ॥
बसले असता आंबडेकर । चालले विचार तरंग ॥ १२४ ॥
कंटाळले ते जीवितास । वृत्ती झाली अत्यंत उदास ॥
पुरे आतां हा नको त्रास । सोडिली आस जीविताची ॥ १२५ ॥
करूनिया ऐसा विचार । होऊनिया जीवावरी उदार ॥
विहिरींत उडी घालावया तत्पर । आंबडेकर जाहले ॥ १२६ ॥
दुसरें कोणी नाहीं जवळा । साधूनि ऐसी निवांत वेळा ॥
पुरवीन आपुले मनाचा सोहळा । दुःखा वेगळा होईन ॥ १२७ ॥
आत्महत्येचें पाप दुर्धर । तरी हा दृढ केला विचार ॥
परी बाबा साई सूत्रधार । तेणें हा अविचार टाळिला ॥ १२८ ॥
तेथेंच चार पावलांवर । एका खाणावळवाल्याचें घर ॥
तयांसही बाबांचा आधार । तोही परिचारक[1] बाबांचा ॥ १२९ ॥
सगुण येऊनि उंबऱ्यावरती । पुसे आंबडेकरांस ते वक्ती ॥
ही अक्कलकोट महाराजांची पोथी । वाचिली होती का कधीं ॥१३०॥
पाहूं पाहूं काय ती पोथी । म्हणून आंबडेकर हातीं घेती ॥
सहज पानें चाळूनि पाहती । वाचूं लागती मध्येंच ॥ १३१ ॥
कर्मधर्मसंयोग कैसा । विषयही वाचावया आला तैसा ॥
अंतर्वृत्तींत वाचण्यासरिसा । उमटला ठसा तात्काळ ॥ १३२॥
सहजासहजीं आली जी कथा । निवेदितों मी श्रोतियां समस्तां ॥
तात्पर्यार्थें अति संक्षेपता । ग्रंथ विस्तारताभयार्थ ॥ १३३ ॥
अक्कलकोटीं संत वरिष्ठ । असतां महाराज अंतर्निष्ठ ॥
भक्त एक बहु व्याधिष्ट । दुःसह कष्ट पावला ॥ १३४ ॥

१ सेवेकरी.

शेवा केली बहुत दिन । व्याधीविहीन होईन म्हणून ॥
होईनात ते कष्ट सहन । अति उद्विग्न जाहला ॥ १३५ ॥
करूनि आत्महत्येचा निर्धार । पाहूनिया रात्रीचा प्रहर ॥
जाऊनि एका विहीरीवर । केला शरीरपात तेणें ॥ १३६ ॥
इतुक्यांत महाराज तेथें आले । स्वहस्तें तयास बाहेर काढिलें ॥
भोक्तृत्व सारें पाहिजे भोगिलें । उपदेशिलें तयास ॥ १३७ ॥
अपुल्या पूर्वकर्मा जोग । व्याधी कुष्ट क्लेश वा रोग ॥
जाहल्यावीण पूर्ण भोग । हत्यायोग काय करी ॥ १३८ ॥
हा भोग राहतां अपुरा । जन्म घ्यावा लागे दुसरा ॥
म्हणूनि तंसेच साहे कष्ट जरा । आत्महत्यारा होऊं नको ॥ १३९ ॥
वाचूनि ही समयोचित कथा । थक्क जाहले आंबडेकर चित्ता ॥
जागींच वरमले अवचिता । बाबांची व्यापकता पाहूनी ॥ १४० ॥
आंबडेकर मनीं तरकले । पूर्व अदृष्ट पाहिजे भोगिलें ॥
हेंच योग्य प्रसंगीं सुचविलें । साहस योजिलें न भलें तें ॥ १४१ ॥
जैशी वाचा अशरीरिणी । तैसीच या दृष्टांताची करणी ॥
हेत जडला साईचे चरणीं । अघटित घटणी साईची ॥ १४२ ॥
सगुणमुखें साईचा इषारा । हा अकल्पित पुस्तकद्वारा ॥
यावया विलंब लागता जरा । होता मातेरा जन्माचा ॥ १४३ ॥
मुकलों असतों निज जीविता । करितों दुर्धर कुटुंब घाता ॥
स्त्रियेवरी ओढवितों अनर्था । स्वार्था परमार्था नागवितों ॥ १४४ ॥
पोथीचें करूनिया निमित्त । बाबांनी केलें सगुणास प्रवृत्त ॥
आत्मघातापासाव चित्त । परावृत्त केलें कीं ॥ १४५ ॥
प्रकार ऐसा जरी न घडता । बिचारा व्यर्थ जिवास मुकता ॥
परी जेथें साईसम तारिता । काय तो मारीता मारील ॥ १४६ ॥
अक्कलकोट स्वामीची भक्ती । या भक्ताचे वडिलास होती ॥
तीच पुढें चालवा ही प्रचीती । आणूनि देती त्या बाबा ॥ १४७ ॥

१ आत्महत्या करून घेण्याचा प्रसंग. २ आकाशवाणी.

असो पुढें वरवें झालें। हेही दिवस निघून गेले ॥
जोतिर्विद्येंत परिश्रम केले। फळही आलें उदयाला ॥ १४८ ॥
साईकृपा प्रसाद पावले। पुढें आले दिवस चांगले ॥
जोतिर्विद्येंत प्राविण्य संपादिलें। दैन्य निरसलें पूर्वील ॥ १४९ ॥
वाढलें गुरुपदीं प्रेम। जाहलें सुख कुशल क्षेम ॥
लाधलें गृहसौख्य आराम। आनंद परम पावले ॥ १५० ॥
ऐसे अगणित चमत्कार। एकाहूनि एक थोर ॥
कथितां होईल ग्रंथ विस्तार। तदर्थ सार कथियेलें ॥ १५१ ॥
हेमाड साईपदीं शरण। पुढील अध्यायीं गोड कथन ॥
विष्णुसहस्रनाम दान। शामेया लागूनि दीधलें ॥ १५२ ॥
नको नको म्हणतां शामा। बाबांस अनिवार तयाचा प्रेमा ॥
बळेंच देतील सहस्रनांवा। सुंदर महात्म्य वर्णून ॥ १५३ ॥
आतां सादर परिसा ती कथा। अनुग्रहाचा समय येतां ॥
शिष्याची इच्छा मुळींही नसतां। बाबा तो देतां दिसतील ॥ १५४ ॥
अनुग्रहाची अलौकिक परी। कैसी असते सद्गुरु घरीं ॥
दिसूनि येईल अध्यायांतरीं। श्रोतां आदरें परिसिजे ॥ १५५ ॥
कल्याणाचें जें कल्याण। तो हा साई गुण निधान ॥
सभाग्य पुण्यश्रवण कीर्तन। चरित्र पावन जयाचें ॥ १५६ ॥
इति श्री संतसज्जन प्रेरिते। भक्त हेमाडपंत विरिचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते। अपस्मारात्महत्या निवारणं
तथा निज गुरुपद स्थिरीकरणं नाम। षड्विंशतितमोध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

१ माधवराव देशपांडे.

या मासिकांत आरंभापासून प्रसिद्ध होत असलेल्या श्रीसाईसच्चरितावर रावबहादूर श्री. चिंतामणराव विनायक वैद्य एम्. ए. एलएल्. बी. कल्याण, यांचा अभिप्राय.

साईलीला मासिकांत येणारें रा. दाभोळकर गोविंद रघुनाथ हे लिहीत असलेलें श्रीसाईसच्चरित मी मोठ्या प्रेमानें वाचतों. या चरित्रांत भक्ति व ज्ञान या दोहोंचें उत्तम आविष्करण होत आहे व तें अनुभवाच्या मार्गानें होत असल्यानें ग्रंथाची भाषा गोड व गंभीर अशीच येत आहे. ओव्यांतील चारी यमकें सहज प्रयत्नाविना साधलेलीं असतात, व विषयही मनोवेधक रीतीनें मांडलेला असतो. श्री-साईचरित्राला मला वाटतें, हेमाडपंत हे महिपतीच लाधले आहेत. संतचरित्र गाण्यास काव्य व भक्तिरसाची जोड नेहमीच लागते व या दोहोंचाही मिलाफ या चरित्रांत चांगला व्यक्त होतो."

---


## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी **दासगणू**महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. कि. ८-आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतीत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची कि. प्र. फीसह ३। रु.

— ग. अ. सराफ, नांदेड.